ePaper

## खरगेंच्या पंतप्रधानपदाच्या दावेदारीला काँग्रेसच्याच मुख्यमंत्र्याचा विरोध?



| वर्ष - 7 | अंक - 231 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 30 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत


- कमिन्सने पटकावल्या १० विकेट्स
- अंधश्रद्धेचे 'पंचक' सोडवणार
- आघाडीसमोर जागावाटपाचे आव्हान!
- मराठी माणसाचा अपमान


# ‘आपला दवाखाना’चा डोस

## शहरात 40 ठिकाणी सुविधा : राज्य सरकारचा उपक्रम

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील नागरिकांना आपल्या घराजवळच आरोग्य व वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, यासाठी महापालिका राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत शहरातील 40 ठिकाणी ‘नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र’ व ‘हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’ सुरू करणार आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेची आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. या आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत पाच केंद्रे व आपला दवाखाना असेल, असे नियोजन महापालिकेने केले आहे. यासाठी भाडेतत्त्वावर जागा घेतली जाणार आहे. ‘नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र’ व ‘हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’ यासाठी जागा देणाऱ्या मालकांसोबत 11 महिन्यांचा भाडेकरार केला जाणार असून आवश्यकतेनुसार मुदतवाढ दिली जाणार आहे. भाडे तत्त्वावर द्यावयाच्या मालमत्ता किंवा मिळकतींचे सर्व कर, पाणीपट्टी, विद्युत देयके करारनामा करण्याच्या तारखेपर्यंत भरलेली असणे आवश्यक आहे.



भाडेकरार केल्याच्या तारखेपासून करार संपुष्टात येण्याच्या तारखेपर्यंत येणारी सर्व विद्युत व पाणीपट्टी देयके महापालिकेच्या वैद्यकीय विभाग भरणार आहे. मात्र, मिळकत कर, देखभाल दुरुस्ती खर्च व भाडेकरार करण्यासाठीचा खर्च जागा मालकाने करायचा आहे. बाजारभावाप्रमाणे अथवा महापालिकेने निश्चित केलेल्या दराने दरमहा भाडे दिले जाणार आहे. इमारतीबाबत. भविष्यात वादविवाद किंवा काही अडचण निर्माण झाल्यास भाडेकरार आपोआप संपुष्टात येणार आहे. कायदेशीर बाबी उद्भवल्यास जागा मालक जबाबदार राहतील.

### ...या आहेत अटी-शर्ती

दवाखान्यासाठी जागा उपलब्ध करून देताना जागा मालकाने स्वच्छतागृह व वॉश बेसिनची सोय करून देणे आवश्यक आहे. जागेच्या बांधकामाचे आकारमान किमान 750 ते कमाल एक हजार चौरस फुट व किमान तीन-चार खोल्या असाव्यात, अशा अटी व शर्ती आहेत.

---

# स्मार्ट इंडिया हॅकाथॉनमध्ये 'पीसीईटी 'ची बाजी

## ‘डिफिकल्टी इन ऑपरेटिंग हेवी अर्थ मूव्हिंग मशिनरीज ड्युरिंग द रेनी सीजन’ प्रकल्प

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या ‘हायड्रोमाइनेक्स’ संघाने भारत सरकारद्वारे आयोजित आणि नल्ला मल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, हैद्राबाद, तेलंगणा यांच्या सहकार्याने आयोजित ‘स्मार्ट इंडिया हॅकाथॉन 2023’ च्या महाअंतिम फेरीत प्रथम पारितोषिक पटकावले.**

पीसीईटीच्या संघाने ‘डिफिकल्टी इन ऑपरेटिंग हेवी अर्थ मूव्हिंग मशिनरीज ड्युरिंग द रेनी सीजन’ या समस्येचा अभ्यास करून अभिनव प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाला खाण मंत्रालयाच्या अंतर्गत हार्डवेअर प्रकारात एक लाख रुपयांचे पहिले पारितोषिक मिळाले. हायड्रोमाइनेक्स संघाचे नेतृत्व इ अँण्ड टीसी विभागाच्या कौशल लवांडे याने तर आंचल गुल्हाने, अदिती चंदनवार, प्रथमेश चव्हाण, यश जाधव आणि संगणक विभागातून प्रथमेश चौगले यांचा समावेश होता. एनएमआरसीचे अध्यक्ष नल्ला मल्ला रेड्डी,



संचालक डॉ. दिव्या नल्ला, खाण मंत्रालयाचे सदस्य राजेश विंचूरकर, एनएमआरसीचे प्राचार्य डॉ.एम. एन.व्ही. रमेश यांच्या हस्ते विजेत्या संघाला गौरवण्यात आले.

संघ मार्गदर्शक डॉ. वर्षा हरपळे, प्रा. प्रमोद सोनवणे, प्रा. वैशाली पाटील, डॉ. महेश कोलते विभाग प्रमुखांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीळकंठ चोपडे यांनी अभिनंदन केले.

# पवार यांच्या आदेशाने प्रशासन कामाला

## » प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्हा नियोजन समितीच्या निधीवरून एकीकडे भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या महायुतीत ठिणगी पडली असताना दुसरीकडे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तत्कालीन पालकमंत्र्यांनी आठ महिन्यांपूर्वी नियोजन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बैठक न घेताच निधी वाटपात बदल करून रखडलेल्या कामांना मंजुरी देण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.**

नव्या पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करून कामांच्या याद्यांना थेट मान्यता देण्यात येत आहे. निधी वाटपाच्या या कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊन भाजप आणि शिंदे गटाने न्यायालयात जाण्याचा इशारा दिला असून, याचा फटका जिल्ह्यातील विकासकामांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बाबत प्रशासनाकडून तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे पळवाट काढण्याची चतुराई दाखवली जात आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार दर तीन महिन्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक होणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात नवीच पद्धत सुरू झाली आहे. वर्षभरातून अवघ्या दोन बैठका घेतल्या जात आहेत. १९ मे रोजी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या जिल्हा नियोजन बैठकीनंतर अद्याप बैठक झालेली नाही. या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सदस्यांनाच माहिती नाही. भाजपच्या अनेक सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने जिल्हा नियोजन विभागाने जिल्हा परिषदेकडे मंजूर कामांच्या पडताळणीसाठी दिलेली यादी गुरुवारी (२८ डिसेंबर) परत मागून घेतल्याचे जिल्हा परिषदेकडून सांगण्यात



येत आहे. तसेच पालकमंत्र्यांना एकट्यालाच कामांना मंजुरी देण्याचे अधिकार आहेत किंवा नाही या बाबत नियमांचा किस पाडला जात आहे.तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंजूर केलेली कामे नियमानुसार आहेत. मात्र, या याद्यांमध्ये बदल करून ९० टक्के निधी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या सांगण्यावरून वाटप करण्याचे नियोजन झाले आहे. या कामांच्या याद्या जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, या याद्या नियोजन विभागाने परत मागून घेतल्या असल्याचे जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्न उपस्थित होत आहे. राज्य सरकारच्या २०१२-२०१३मधील परिपत्रकानुसार पालकमंत्र्यांना एकट्याला कामांना मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. तसेच १९८९मध्ये जिल्हा नियोजन समितीचे कार्य आणि अधिकार, चरण वाघमारे यांच्या उच्च न्यायालयातील याचिकेनंतर शासनाने २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेला आदेश यांची पडताळणी करत नियोजन समिती आणि जिल्हा परिषद यांचे अधिकार अबाधित ठेवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीचे शासन नियुक्त नामनिर्देशित, मतदानाचा हक्क असणारे सदस्य आहेत. त्यामुळे समितीची बैठक घेऊन कामांचा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्य सरकारच्या निर्देशानुसार दर तीन महिन्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक होणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात नवीच पद्धत सुरू झाली आहे. वर्षभरातून अवघ्या दोन बैठका घेतल्या जात आहेत. १९ मे रोजी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या जिल्हा नियोजन बैठकीनंतर अद्याप बैठक झालेली नाही. या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सदस्यांनाच माहिती नाही. भाजपच्या अनेक सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने जिल्हा नियोजन विभागाने जिल्हा परिषदेकडे मंजूर कामांच्या पडताळणीसाठी दिलेली यादी गुरुवारी (२८ डिसेंबर) परत मागून घेतल्याचे जिल्हा परिषदेकडून सांगण्यात येत आहे. तसेच पालकमंत्र्यांना एकट्यालाच कामांना मंजुरी देण्याचे अधिकार आहेत किंवा नाही या बाबत नियमांचा किस पाडला जात आहे.

### याद्या नियोजन विभागाने परत

» राज्य सरकारच्या २०१२-२०१३मधील परिपत्रकानुसार पालकमंत्र्यांना एकट्याला कामांना मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. तसेच १९८९मध्ये जिल्हा नियोजन समितीचे कार्य आणि अधिकार, चरण वाघमारे यांच्या उच्च न्यायालयातील याचिकेनंतर शासनाने २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेला आदेश यांची पडताळणी करत नियोजन समिती आणि जिल्हा परिषद यांचे अधिकार अबाधित ठेवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीचे शासन नियुक्त नामनिर्देशित, मतदानाचा हक्क असणारे सदस्य आहेत. त्यामुळे समितीची बैठक घेऊन कामांचा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, या याद्यांमध्ये बदल करून ९० टक्के निधी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या सांगण्यावरून वाटप करण्याचे नियोजन झाले आहे. या कामांच्या याद्या जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, या याद्या नियोजन विभागाने परत मागून घेतल्या असल्याचे जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्न उपस्थित होत आहे.

# न्यू ईयरलाही पुणे - मुंबई एक्सप्रेस वे जॅम?

## » महामार्ग पोलिसांकडून केवळ आवाहन, कारवाई नाहीच

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दरवर्षीप्रमाणे यंदा देखील नाताळच्या सुट्ट्यांमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर (PUNE MUMBAI EXPRESSWAY) वाहतूक कोंडीचा सामना प्रवशांना करावा लागला. पण त्यातून देखील महामार्ग पोलिसांनी धडा घेतलाच नाही का असा सवाल सध्या उपस्थित केला जातोय. कारण आता नव वर्षाच्या सेलिब्रेशनच्या निमित्ताने अवजड वाहतुकदारांना पुन्हा एकदा केवळ आवाहन करण्यातच वाहतूक पोलिसांनी धन्यता मानली असल्याचं म्हटलं जातंय.**

त्यामुळे नव वर्षाच्या सेलिब्रेशनच्या वेळेस देखील पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना प्रवाश्यांना करावा लागणार असल्याचं म्हटलं जातंय.

बेशिस्त अजवड वाहतूकदार महामार्ग पोलिसांच्या आवाहनाला नेहमीच केराची टोपली दाखवत असल्याचं पाहायला मिळतं. दरम्यान ही बाब मागील आठवड्यातच सिद्ध देखील झालं होती. पण तरीही पुन्हा एकदा महामार्ग पोलिसांनी केवळ आवाहन केल्यामुळे पुन्हा एकदा प्रचंड वाहतूक कोंडीला आमंत्रण देत असल्याचं म्हटलं जातंय. वाहतूक कोंडीबाबत महामार्ग पोलिसांच्या या भूमिकेमुळे प्रवाश्यांमधून देखील नेहमी नाराजीचा सूर उमटतो. शनिवार



30 डिसेंबर आणि रविवार 31 डिसेंबर अशा सलग सुट्ट्या आणि नवीन वर्षाचं सेलिब्रेश यासाठी बरेच लोक पर्यटन स्थळांवर जात असतात. त्यामुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे. सलग सुट्टी आल्यामुळे घाटमध्ये वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. पण हीच वाहतूक कोंडी फोडण्यासाठी घाट सुरू होण्यापूर्वी जड अवजड वाहनांना थांबविण्यात येते आणि वाहतूक कोंडी संपल्यानंतर जड अवजड वाहनांना पुन्हा एकदा प्रवास करण्यास परवानगी देण्यात येते. मागील वाहतूक कोंडीचे परीक्षण केले असता मागील शनिवारी 24 तासांमध्ये 55,868 वाहने द्रुतगती महामार्गावरील पुणे वाहिनी वरून गेली. मुंबई पुणे जुना महामार्ग NH 48 या वरून 21,135 वाहने गेली. सदर वाहनांना घाटामधील संयुक्तिक मार्गाचा सुद्धा वापर करावा लागतो. इतक्या प्रचंड प्रमाणात वाहने आल्यानंतर घाटामध्ये वाहतूक कोंडी झाली होती.तरी सर्व जड अवजड वाहन मालक,चालक संघटना यांना आवाहन करण्यात येते की, वर नमूद दिवशी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे वाहिनीवरील प्रवास दुपारी 12.00 नंतर सुरू केल्यास त्यांना घाटामध्ये थांबण्याची गरज पडणार नाही.

### पोलिसांकडून पुन्हा एकदा आवाहन

» तसेच वाहतूक कोंडी मुळे सदर वाहनांचे क्लच प्लेट जाणे, इंजिन चे काम निघणे इत्यादी टळू शकेल तसेच इंधन व वेळची बचत होईल. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील नाताळच्या सुट्ट्यांमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर पोलिसांनी धडा घेतलाच नाही का असा सवाल सध्या उपस्थित केला जातोय. कारण आता नव वर्षाच्या सेलिब्रेशनच्या निमित्ताने अवजड वाहतुकदारांना पुन्हा एकदा केवळ आवाहन करण्यातच वाहतूक पोलिसांनी धन्यता मानली असल्याचं म्हटलं जातंय.

# प्रभू श्रीरामाच्या मंदिर लोकार्पण सोहळ्यात घुमणार पिंपरी- चिंचवडचा 'चौघडा'!

## गेल्या 40 वर्षांपासून चौघडा वादन करणारे वादक पाचंगेंना विशेष निमंत्रण

। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा मोठ्या उत्साहात लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी अनेक महत्वाचे मान्यवर उपस्थिती लावणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील असणार आहेत. या सोहळ्यासाठी पिंपरी- चिंचवड शहरातील चौघडा वादक रमेश पाचंगे यांची निवड करण्यात आली आहे. रमेश पाचंगे हे गेल्या ४० वर्षांपासून चौघडा वादन करतात.**



अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराचं स्वप्न अखेर कित्येक वर्षांनी पूर्ण होत आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अनेक दिग्गज आणि महत्त्वाची मंडळी, नेते सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात चौघडा वादनासाठी पिंपरी- चिंचवड शहरातील रमेश पाचंगे यांना निमंत्रित करण्यात आले. रमेश पाचंगे म्हणाले, मला खूप आनंद झाला आहे. राम मंदिरात चौघड्याचे नाद घुमणार आहेत.

> "अयोध्येच्या राम मंदिराचे खजिनदार गिरी महाराज यांनी माझी निवड केली आहे. त्यांनी माझा चौघडा ऐकला होता. तेव्हाच त्यांनी म्हटलं होतं की तुम्हाला अयोध्येत घेऊन जाणार. त्यांनी माझा सत्कारही केला होता. खास चौघडा वाजवण्यासाठी आमंत्रित केल्याने मी आनंदी आहे.
> **-रमेश पाचंगे,** चौघडा वादक






# सहकारी बँकांत सत्ताधाऱ्यांचेच लाड?

**'एक वेळची विशेष बाब' म्हणून सूट देत राज्य मंत्रिमंडळाने शासकीय बँकिंग व्यवहार हाताळण्याची परवानगी देणे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरिता याच बँकेची निवड करणे आणि गृहनिर्माण संस्थांना याच बँकेत ठेवी ठेवण्याचा सहकार विभागाने आदेश देणे यावरून भाजपचे आमदार प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या मुंबै बँकेला विद्यमान सरकार कसे झुकते माप देते हेच स्पष्ट होते.**




या बँकेचा कारभार चोख असता आणि सरकारने परवानग्या दिल्या असत्या तरी एक वेळ ठीक होते. पण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबै बँकेत आर्थिक घोटाळयांची अनेक प्रकरणे बाहेर आली. बँकेच्या कारभारात अनियमितता झाल्याचा ठपका लेखापरीक्षकांनी ठेवला होता. आर्थिक गुन्हे शाखेत गुन्हा दाखल झाला होता. मजूर सहकारी संस्था मतदारसंघातून निवडून आलेले दरेकर हे मजूर नसल्याने त्यांना सहकार विभागाने अपात्र ठरविले होते. 'लोकसत्ता'ने मुंबै बँकेतील घोटाळा आणि दरेकर यांच्या गैरकारभारावर प्रकाश टाकला होता. महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहारांवर विरोधी पक्षनेते असताना देवेंद्र फडणवीस तुटून पडत असत. पण दरेकर यांच्या कार्यकाळात झालेला गैरकारभार फडणवीस यांच्या लेखी फारसा गंभीर नसावा. भाजपचे मुंबईकर नेते किरीट सोमय्या यांना उठता-बसता शिवसेना, राष्ट्रवादी किंवा काँग्रेस नेत्यांचा गैरव्यवहार दिसायचा. 'ईडी' कार्यालयात त्यांचा नुसता राबता वाढला नव्हता तर कोणाला कधी अटक होणार याची भविष्यवाणी सोमय्या वर्तवू लागले होते. एवढे 'सतर्क' असलेल्या सोमय्या यांना मुंबै बँकेतील गैरव्यवहार दिसला नसावा किंवा त्यांनी डोळयांवर पट्टी लावली असावी. महाविकास आघाडीचे सरकार जाऊन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार विराजमान होताच दरेकर यांना पुन्हा 'अच्छे दिन' आले. शिवसेना, मनसे मग भाजप अशा कोलांटउडया मारणाऱ्या दरेकर यांना सत्तांतरानंतर मंत्रीपदाचे वेध लागले होते. मंत्रीपद नाकारून भाजपच्या धुरीणांनी दरेकर यांची मुंबै बँकेच्या अध्यक्षपदावर बोळवण केली. मग शासकीय बँकिंग व्यवहार हाताळण्यासाठी मंत्रिमंडळाने जिल्हा मध्यवर्ती आणि सहकारी बँकांची निवड केली. पण लेखापरीक्षण अहवाल प्रतिकूल असल्याने, या यादीत मुंबै बँक बसत नव्हती. दरेकर अध्यक्ष असताना मुंबै बँकेला डावलणे भाजपच्या नेत्यांच्या पचनी पडले नसावे. मग मंत्रिमंडळाने 'एक वेळची विशेष बाब' म्हणून मुंबै बँकेला माफ केले. सरकारी यंत्रणा एवढे करून थांबली नाही. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, गृहनिर्माण संस्थांना मुंबै बँकेत ठेवी ठेवण्याचे एकापाठोपाठ फर्मान निघू लागले. शिक्षकांच्या वेतनाच्या आदेशात बदल करण्यात आला खरा, पण तो उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर! रा. स्व. संघाशी संबंधित पुण्यातील जनता सहकारी किंवा ठाणे जनतासारख्या ठिकठिकाणच्या नागरी बँकांचा कारभार चोख आणि सुस्थितीत. नाव ठेवायला जागा नसते. याउलट भाजपचे आमदार दरेकर यांच्या अध्यक्षतेखालील मुंबै बँकेचा कारभार. कारभाराची लक्तरे निघाली तरीही भाजपचे नेतृत्व दरेकर यांच्या पाठी ठामपणे उभे. प्रसाद लाड, विखे-पाटील आदी अन्य पक्षांमधून भाजपमध्ये आलेल्या नेत्यांच्या संस्था किंवा कंपन्यांचाही साराच कारभार वादग्रस्त. विशेष म्हणजे हे सारे नेते फडणवीस यांचे लाडके. राधाकृष्ण विखे-पाटील काँग्रेसमध्ये असताना त्यांच्या आधिपत्याखालील मुळा-प्रवरा वीज कंपनीचे दिवाळे निघाले होते. कंपन्यांचा कारभार वादग्रस्त. सरकारी नोकर भरतीपासून ते साफसफाईपर्यंतच्या कामात यांचे 'लाड' सुरूच. भाजपमध्ये जुन्याजाणत्या आणि तत्त्वांशी प्रामाणिक असलेल्या नेत्यांची कुचंबणा आणि बाहेरच्या पक्षांतून आलेल्या आणि भानगडबाज नेत्यांची चलती सुरू. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याचे घाटत आहे. पण मुंबै या सहकारी बँकेत भाजपचे नेतृत्व गैरव्यवहार आणि अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात आलेल्या दरेकर यांची पाठराखण करते हे चित्र अमित शहा यांच्या कल्पनेशी विसंगत वाटणारे आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार असताना दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या सहकारी संस्थांना झुकते माप दिल्याबद्दल तेव्हा भाजपचे नेतेच विधिमंडळात आवाज उठवत.

## संपादकीय »

# भाडोत्रींचा भयकंप!

***यंदाच्याच वर्षात दुसऱ्या एका देशाच्या खासगी लष्कराने तिसऱ्या देशात मांडलेला उच्छाद जगाने अनुभवला.***

वर्ष संपता संपता आलेली ही बातमी सगळयांचीच झोप उडवणारी ठरेल. ती आहे चीनबाबत. एरवी कबूल करण्यास आपणास अडचणीचे होत असले तरी चीन आपली डोकेदुखी बनलेला आहे, हे सत्य. आणि लडाख परिसरातील त्या देशाच्या घुसखोरीवर आपणास अद्याप उतारा सापडलेला नाही, हेही सत्य. त्यात आता या वृत्ताची भर. चीनचे सरकार धोरण म्हणून खासगी लष्करास उत्तेजन देत असून हे खासगी लष्कर प्राय: 'परदेशांतील चिनी हितसंबंधांच्या रक्षणार्थ' वापरले जाणार आहे. ही बातमी चीनमधीलच 'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट' या दैनिकाने विस्ताराने दिली आणि नंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांनी ती प्रसृत केली. या बातमीच्या विश्वासार्हतेबाबत संशय नको, म्हणून हा तपशील. वास्तविक २०१८ पासून चीन आणि खासगी लष्कर उभारणीची चर्चा 'फॉरीन अफेअर्स', 'फॉरीन पॉलिसी' अशा प्रकाशनांतून होत होती. तीस या वृत्ताने दुजोरा दिला.

**राहुल गांधींची ती दुसरी 'भारत जोडो यात्रा' नाही, तर नवीन यात्रा आहे. ही नवीन यात्रा तेव्हापेक्षा वेगळया कालखंडात, वेगळया भूप्रदेशात होते आहे. दरम्यानच्या काळात राहुल गांधीही बदलले आहेत. केवळ सभा आणि पत्रकार परिषदा घेण्यापेक्षा या यात्रेच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणण्याची नियोजित मोहीम अधिक चांगली आहे.**

# देशकाल : नव्या यात्रेकडून नव्या अपेक्षा!

पण या पद्धतीच्या यात्रेतून किती राजकीय फायदा मिळेल हा मुख्य प्रश्न आहे. ही नवी यात्रा नवीन आव्हाने आणि नव्या संधींचा कसा सामना करते यातून ते कळेल. राहुल गांधी, काँग्रेस पक्ष आणि देशाच्या भवितव्यासाठी ही यात्रा किती महत्त्वाची होती, हे त्यावरूनच ठरेल. अर्थात या दोन्ही यात्रांमध्ये वरवर काही गोष्टी समान आहेत, अगदीच नाही असे नाही. २०२२ मध्ये उदयपूरमध्ये पहिल्या 'भारत जोडो यात्रे'ची घोषणा करण्यात आली. तेव्हाचे वातावरण वेगळे होते. भाजपच्या उत्तर प्रदेशातील अनपेक्षित विजयानंतर आणि विरोधकांमध्ये आलेल्या निराशेच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा करण्यात आली होती. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये झालेल्या भाजपच्या आश्चर्यकारक विजयानंतर आता 'भारत न्याय यात्रा' जाहीर करण्यात आली आहे. या तीन राज्यांमधील भाजपच्या विजयाने तेलंगणामधील काँग्रेसचा उल्लेखनीय विजय झाकोळला गेला होता. मागच्या



वेळेप्रमाणे यावेळीही विरोधी पक्ष त्यातही विशेषत: काँग्रेसच्या कार्यकर्ते आणि समर्थकांच्या नैतिक धैर्यावर परिणाम झाला आहे. अर्थात असे असले तरी दोन भारत जोडो यात्रांमध्ये एक मुख्य फरक आहे. पहिली भारत जोडो यात्रा झाली ती सार्वत्रिक निवडणुकीच्या जवळपास दोन वर्षे आधी. तर दुसरी यात्रा लोकसभा निवडणुकीला आता चार महिन्यांहून कमी कालावधी उरलेला असताना होत आहे. याशिवाय, लोकांमध्ये पुन्हा आशा जागृत करणे अवघड आहे. अलीकडच्या निवडणुकांमधील पाच राज्यांतील निकालांपेक्षा भाजपचा तेव्हाचा उत्तर प्रदेशमधील विजय अधिक निर्णायक असला तरी, यावेळी भाजपविरोधी शक्तींचे जास्तच नैतिक नुकसान झाले आहे. त्यामुळे, केवळ आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमधलेच नाही तर इंडिया आघाडीतील इतर पक्षांमधील चैतन्य जागृत करणे, हे राहुल गांधींसमोरील पहिले आणि सर्वात मोठे आव्हान आहे. हे दुसऱ्या आव्हानाशी संबंधित आहे. भारत जोडो यात्रा आयोजित करण्यात आली होती, तेव्हा इंडिया युती वगैरे काही नव्हते. काँग्रेसच्या काही प्रादेशिक मित्रपक्षांनी जसे की तमिळनाडूमध्ये द्रमुक, केरळमधील यूडीएफ, महाराष्ट्रात राष्ट्रवादी आणि शिवसेना, उत्तर प्रदेशात आरएलडी या पक्षांनी भारत जोडो यात्रेला वेगवेगळया प्रमाणात पाठिंबा दिला. पण काहीजण बरोबर आले म्हणून किंवा काहीजण आले नाहीत म्हणून ही यात्रा यशस्वी झाली असे नाही. उलट यावेळी इंडिया आघाडी झालेली आहे आणि जागावाटपावर गांभीर्याने वाटाघाटी सुरू आहेत. काँग्रेस आणि काही प्रादेशिक पक्षांमध्ये तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरे आणि पवारच सगळं ठरवणार!

## » जागावाटप काँग्रेसचे नेते सहभागी होणार नाहीत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसच्या (CONGRESS) केंद्रीय समितीची आणि महाराष्ट्रातील नेत्यांची बैठक शुक्रवार 29 डिसेंबर रोजी दिल्लीत पार पडली. या बैठकीमध्ये जागावाटपासंदर्भात चर्चा करण्यात आल्याची माहिती समोर येतेय. लोकसभा निवडणुकांसाठी (LOKSABHA ELECTION 2024) महाविकास आघाडीतील जागावाटपाच्या प्रक्रियेमध्ये काँग्रेसचे राज्यातील नेते सहभागी होणार नाहीत.**

तसेच जागावाटपासंदर्भात काँग्रेस हायकमांड, उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) आणि शरद पवारच (Sharad Pawar) सगळं ठरवणार आहेत. यामझ्ये जिंकण्याची क्षमता हा एकमेव निकष असल्याचं सांगण्यात येतंय. दरम्यान जागावाटपासंदर्भात चर्चा ही दिल्लीत होणार असून ती कधी होणार याबाबत मात्र काँग्रेसच्या नेत्यांना कोणताही कल्पना नाही. तसेच महाराष्ट्रात लोकसभेच्या कोण , किती आणि कुठल्या जागा लढवणार याचाही निर्णय काँग्रेस हायकमांड, उद्धव ठाकरे आणि शरद पवारांसोबत चर्चा करुन घेण्यात येईल. तसेच या बैठकीमध्ये वंचितच्या भूमिकेवरही चर्चा करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. नवी दिल्लीत आज पार पडलेल्या बैठकीमध्ये काँग्रेसच्या आघाडी समितीने महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांबाबतची मतं जाणून घेतली. तसेच यावेळी या नेत्यांचे वंचित बाबतचे देखील मत जाणून घेतले. वंचित बहुजन आघाडी बद्दलचा आधीचा अनुभव पाहता वंचित फार गांभीर्याने गोष्टी घेणार नसल्याचा महाराष्ट्रातील नेत्यांचा सूर होता. पण जागा वाटपाबाबत सगळे निर्णय हायकमांड मविआतील इतर दोन पक्षांसोबत चर्चा करुन करणार असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्रातील नेते या निर्णयप्रक्रियेत नसणार हे देखील



स्पष्ट झालंय. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी मतदारसंघांबाबतचे अहवाल आजच्या बैठकीत समितीला सादर केलेत. यामध्ये जिंकण्याची क्षमता हा जागावाटपाचा निकष असणार आहे. साधारणपणे 8 ते 10 जागांवर वाद होण्याची शक्यता असून इतर जागावाटप सोपे असल्याचा काँग्रेसच्या नेत्यांचा अंदाज आहे. तसेच महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची आजच्या बैठकीत जाणून घेतलेली मते काँग्रेसची समिती हायकमांडला कळवतील. लोकसभेच्या (Loksabha election 2024) जागावाटपाबाबत सध्या बराच संभ्रम निर्माण आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये बैठकांचं सत्र सुरु देखील सुरु आहे. दरम्यान नव वर्षात म्हणजेच जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात दिल्लीत महाविकास आघाडीच्या नेत्यांची चर्चा होणार असल्याची माहिती समोर येतेय. लोकसभेच्या जागावाटपाबाबत दिल्लीत ही बैठक होणार आहे. जानेवारी 2 किंवा 3 तारखेला ही बैठक होण्याची शक्यता आहे. परंतु अद्यापही तारीख ठरलेली नसल्याचं सांगण्यात येतंय. तसेच या बैठकांसाठी उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात दिल्लीला जाण्याची शक्यता आहे.तसेच जागावाटपासंदर्भात काँग्रेस हायकमांड, उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) आणि शरद पवारच (Sharad Pawar)

### उद्धव ठाकरे दिल्लीवारी करणार

» नवी दिल्लीत आज पार पडलेल्या बैठकीमध्ये काँग्रेसच्या आघाडी समितीने महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांबाबतची मतं जाणून घेतली. तसेच यावेळी या नेत्यांचे वंचित बाबतचे देखील मत जाणून घेतले. वंचित बहुजन आघाडी बद्दलचा आधीचा अनुभव पाहता वंचित फार गांभीर्याने गोष्टी घेणार नसल्याचा महाराष्ट्रातील नेत्यांचा सूर होता. पण जागा वाटपाबाबत सगळे निर्णय हायकमांड मविआतील इतर दोन पक्षांसोबत चर्चा करुन करणार असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्रातील नेते या निर्णयप्रक्रियेत नसणार हे देखील स्पष्ट झालंय. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी मतदारसंघांबाबतचे अहवाल आजच्या बैठकीत समितीला सादर केलेत. यामध्ये जिंकण्याची क्षमता हा जागावाटपाचा निकष असणार आहे. साधारणपणे 8 ते 10 जागांवर वाद होण्याची शक्यता असून इतर जागावाटप सोपे असल्याचा काँग्रेसच्या नेत्यांचा अंदाज आहे. तसेच महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची आजच्या बैठकीत जाणून घेतलेली मते काँग्रेसची समिती हायकमांडला कळवतील. लोकसभेच्या (Loksabha election 2024) जागावाटपाबाबत सध्या बराच संभ्रम निर्माण आहे.

सगळं ठरवणार आहेत. यामझ्ये जिंकण्याची क्षमता हा एकमेव निकष असल्याचं सांगण्यात येतंय. दरम्यान जागावाटपासंदर्भात चर्चा ही दिल्लीत होणार असून ती कधी होणार याबाबत मात्र काँग्रेसच्या नेत्यांना कोणताही कल्पना नाही. तसेच महाराष्ट्रात लोकसभेच्या कोण , किती आणि कुठल्या जागा लढवणार याचाही निर्णय काँग्रेस हायकमांड, उद्धव ठाकरे आणि शरद पवारांसोबत चर्चा करुन घेण्यात येईल. तसेच या बैठकीमध्ये वंचितच्या भूमिकेवरही चर्चा करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. नवी दिल्लीत आज पार पडलेल्या बैठकीमध्ये काँग्रेसच्या आघाडी समितीने महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांबाबतची मतं जाणून घेतली.

# मराठी माणसाचा दिल्ली दरबारात अपमान

## » देवेंद्र फडणवीसांवरील अन्यायांची यादी वाचत सुप्रिया सुळेंचा संताप

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपाचा दिल्ली दरबार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अपमान करत असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. भाजपाने देवेंद्र फडणवीस यांची दोन वेळा पदावनती केली आहे, दिल्लीत एका मराठी माणसाचा अपमान केला जात आहे, त्यामुळे मला वाईट वाटतं, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शेतकरी आक्रोश मोर्चाच्या तिसऱ्या दिवसाची आज (शुक्रवार, २९ डिसेंबर) सकाळी जुन्नर येथून सुरुवात झाली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. सुप्रिया सुळे यांच्याबरोबर खासदार अमोल कोल्हेदेखील उपस्थित होते. यावेळी सुप्रिया सुळे यांनी डोक्यावर भाजीपाल्याची टोपली घेऊन सरकारचा जाहीर निषेध नोंदवला. शेतकरी आक्रोश मोर्चाविळी सुप्रिया सुळे यांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मांडून केंद्र सरकारला धारेवर धरलं. तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलही भाष्य केलं. सुप्रिया सुळे म्हणाल्या, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर देवेंद्र फडणवीस हे पाच वर्षे मुख्यमंत्री होते. दुर्दैवाने



आता भाजपाचं सरकार असूनही ते मुख्यमंत्रीपदी कायम राहिले नाहीत. त्यांना फारसे अधिकारही दिले जात नाहीत. महाराष्ट्रातला एक कर्तृत्ववान नेता मोठा झाला, मुख्यमंत्री झाला, परंतु, तुम्ही (भाजपा) त्यांना आता उपमुख्यमंत्री केलं आहे. तुम्ही त्यांचा आणखी किती अपमान करणार आहात?

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस आधी मुख्यमंत्री होते. मग तुम्ही त्यांना उपमुख्यमंत्री केलंत. त्यानंतर आता अर्धे उपमुख्यमंत्री केलं आहे. हा फडणवीस यांच्यावरचा अन्याय नाही का? मी विरोधक म्हणून बोलत नाही. एखादा नेता कष्ट करत असेल, स्वतःच्या ताकदीवर

### केंद्र सरकारला धारेवर धरलं

» शेतकरी आक्रोश मोर्चाविळी सुप्रिया सुळे यांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मांडून केंद्र सरकारला धारेवर धरलं. तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलही भाष्य केलं. सुप्रिया सुळे म्हणाल्या, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर देवेंद्र फडणवीस हे पाच वर्षे मुख्यमंत्री होते. दुर्दैवाने आता भाजपाचं सरकार असूनही ते मुख्यमंत्रीपदी कायम राहिले नाहीत. त्यांना फारसे अधिकारही दिले जात नाहीत.

१०५ आमदार निवडून आणत असेल तर त्याचा मानसन्मान करायला नको? परंतु, एका मराठी माणसाचा दिल्ली दरबारात अपमान केला जातोय. याचं मला खूप वाईट वाटतं. शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे मुख्यमंत्री म्हणून राज्याचा कारभार पाहत आहेत. त्यांच्याबरोबर केवळ ४० आमदार आहेत. तर तितकेच आमदार पक्षात असणारे अजित पवार हे उपमुख्यमंत्री झाले आहेत. परंतु, भाजपाचे १०५ आमदार असूनही देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री म्हणून कारभार पाहत आहेत.

# आघाडीसमोर जागावाटपाचे आव्हान!

## बंगालमध्ये एकट्याने निवडणूक लढवण्याची इच्छा : ममता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपशी टक्कर देण्यासाठी काँग्रेस आणि भारतातील 28 पक्षांमधील जागावाटप हे मोठे आव्हान ठरू शकते. लोकसभेत काँग्रेसनंतर तृणमूल काँग्रेसच्या (TMC) अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये त्यांच्या पक्षाची भाजपशी थेट स्पर्धा असल्याचे म्हटले आहे. राज्यातील उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीत ठाकरे गट दादरा आणि नगर हवेलीसह 23 जागांवर निवडणूक लढवत आहे आणि ती जोरदारपणे लढणार आहे. या दोन विधानांनंतर काँग्रेसला जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवणे सोपे जाणार नाही.**

वृत्तसंस्था एएनआयने शुक्रवारी सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, काँग्रेस पक्ष जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापासून भारतातील 28 पक्षांशी जागावाटपाबाबत चर्चा सुरू करेल. TMC प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 28 डिसेंबर रोजी राज्यात लोकसभा निवडणूक एकट्याने लढण्याची इच्छा व्यक्त केली. उत्तर 24 परगणा येथील एका सभेत ममता म्हणाल्या की, आम्हाला कोणत्याही पक्षाला नाही, तर भाजपला धडा शिकवायचा आहे. बंगालमध्ये टीएमसीची थेट स्पर्धा भाजपशी आहे. इंडिया आघाडी देशातील सर्व जागांवर एकत्र निवडणूक लढवणार आहे. जागावाटपाच्या मुद्द्यावर सर्व पक्षांशी खुल्या मनाने चर्चा केली जाईल. शिवसेना (UBT) नेते संजय राऊत यांनी 29 डिसेंबर रोजी महाराष्ट्रात जागावाटपाबाबत कोणतीही तडजोड न करण्याचे संकेत दिले होते. शिवसेना हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीत शिवसेना दादरा आणि नगर हवेलीसह 23 जागांवर लढत असून जोरदार




लढणार आहे. काँग्रेसही राष्ट्रीय पक्ष आहे. उद्धव ठाकरे, राहुल गांधी, सोनिया गांधी मल्लिकार्जुन खरगे, केसी वेणुगोपाल असे ज्येष्ठ नेते या विषयावर बोलत आहेत. महाराष्ट्रात शिवसेना (UBT), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस यांची युती आहे. तिन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत. दुसरीकडे, 19 डिसेंबर रोजी उद्धव गटाचे मुखपत्र सामनाच्या संपादकीयमध्ये काँग्रेसचे वर्णन अहंकारी असे करण्यात आले होते. लेखात लिहिले होते-काँग्रेसला संपूर्ण केकच खायचा आहे. आता इंडिया आघाडीला सारथीची गरज आहे. सध्या भारत आघाडीचा रथ सारथीविना आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल 17 डिसेंबर रोजी भटिंडा येथे आयोजित एका कार्यक्रमात पोहोचले. यावेळी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेही उपस्थित होते. जाहीर सभेत केजरीवाल यांनी पंजाबमधील लोकसभेच्या सर्व 13 जागांसाठी जनतेला विचारणा केली. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे आणि आप प्रमुखांच्या या विधानावरून हे स्पष्ट होते की, पंजाबमध्ये जागावाटपावरून आप आणि काँग्रेसमध्ये संघर्ष होऊ शकतो. अरविंद केजरीवाल यांनी लोकसभा निवडणुकीसाठी पंजाबमधील सर्व 13 जागा मागितल्या आहेत. तिथे आम आदमी पक्षाचे सरकार आहे आणि दिल्लीतही पक्षाची सत्ता आहे. अशा परिस्थितीत राजधानीतही काँग्रेस आणि आम आदमी पार्टीमध्ये जागावाटपावरून वाद होण्याची शक्यता आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने सर्व जागा काबीज केल्या होत्या. राजधानीत आप आणि काँग्रेसमध्ये जागावाटप सोपे होणार नाही. 'आप'ला सत्तेत राहिल्यामुळे जास्त जागा मिळवायच्या आहेत, तर काँग्रेसलाही आपल्याकडे जास्तीत जास्त जागा हव्या आहेत. मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या 2023 दरम्यान, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी काँग्रेसकडे 6 जागा मागितल्या होत्या, 4 जागा सोडण्यास तयार होती. विधानसभेच्या पातळीवर युती नाही हे मला आधी कळले असते, तर मी काँग्रेसशी कधीच बोललो नसतो, असे अखिलेश म्हणाले.

### जागा सोडण्यासाठी काँग्रेसवर दबाव

बिहारमध्ये लोकसभेच्या 40 जागा आहेत. आघाडीत RJD, JDU, काँग्रेस तसेच डावे पक्ष यांचा समावेश आहे. म्हणजे लोकसभेच्या 40 जागांसाठी सहा पक्ष दावेदार आहेत. काँग्रेस नऊ जागांची मागणी करत असताना डाव्या पक्षांनाही अर्धा डझनहून अधिक जागा हव्या आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार 2019 मध्ये विजयी झालेल्या किमान सर्व खासदारांना तिकीट मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहेत. विधानसभेत सर्वात मोठा पक्ष असल्याच्या जोरावर आरजेडी अधिक जागांवर दावा करत आहे. आघाडीमध्ये सामील असलेल्या पक्षांमधील सर्वात मोठा मुद्दा म्हणजे जागावाटपाचा. आघाडीतील बहुतांश पक्ष काँग्रेसवर जास्त जागा सोडण्यासाठी दबाव आणत आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राजकीय परिस्थितीमुळे काँग्रेस सुमारे 310 जागांवर निवडणूक लढवू शकते आणि मित्र पक्षांसाठी सुमारे 230 जागा सोडू शकते.

# प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला सोनियाची उपस्थिती

## योग्य वेळ आल्यावर पक्ष निर्णय घेईल : जयराम रमेश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोनिया गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे अयोध्येत रामलल्लाच्या प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहतील की नाही हे अद्याप ठरलेले नाही. यासंदर्भात योग्य वेळ आल्यावरच पक्ष निर्णय घेईल. असे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी शुक्रवारी सांगितले. 22 जानेवारी 2024 रोजी रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा होणार आहे. यामध्ये सोनिया आणि खरगे यांनाही निमंत्रण पाठवण्यात आले आहे.**



सूत्रांच्या हवाल्याने प्रसारमाध्यमांनी दावा केला आहे की, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि RJD प्रमुख लालू प्रसाद यादव देखील प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहणार नाहीत. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, काँग्रेस खासदार अधीर रंजन चौधरी आणि सीपीआय(एम) सरचिटणीस सीताराम येचुरी यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. सीताराम येचुरी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत. ते X च्या पोस्टमध्ये म्हणाले - धर्म ही वैयक्तिक निवड आहे, ज्याचा वापर राजकीय फायद्यासाठी केला जाऊ नये. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे भाजप आणि आरएसएसने धार्मिक कार्यक्रम राज्य प्रायोजित केले. शिवसेना यूबीटी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना निमंत्रण मिळालेले नाही. याचा त्यांना राग आहे. 22 जानेवारीच्या कार्यक्रमाला त्यांच्या पक्षाचा कोणताही नेता किंवा कार्यकर्ता जाणार नाही, असे उद्धव यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते. तर आपण सर्वजण नंतर अयोध्येला जाऊ असे ठाकरे म्हणालेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी याही अयोध्येला जाणार नसल्याची चर्चा आहे. तृणमूल काँग्रेसचा (टीएमसी) कोणताही नेता यात सहभागी होणार नाही. काही टीएमसी नेत्यांचे म्हणणे आहे की, 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपला स्प्रिंगबोर्ड म्हणून वापरायचे आहे. मात्र, पक्षाकडून कोणतेही वक्तव्य आलेले नाही.

रामलल्लाच्या प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह 6000 दिग्गज सहभागी होणार आहेत. त्यांच्यामध्ये 4000 संत आणि सुमारे 2200 पाहुणे आहेत. या वेळी सहा दर्शनांचे शंकराचार्य (प्राचीन शाळा) आणि सुमारे दीडशे ऋषी-मुनीही उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात सुमारे 25 लाख लोक सहभागी होऊ शकतात.

# राजस्थानमध्ये आज मंत्रिमंडळ विस्तार होणार!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

राजस्थानमध्ये शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. राज्यपाल कलराज मिश्र दुपारी 3.15 वाजता नवीन मंत्र्यांना शपथ देतील. नावांवर एकमत होण्यासाठी मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, प्रदेशाध्यक्ष सीपी जोशी, ज्येष्ठ नेते राजेंद्र राठोड आणि प्रदेश सहप्रभारी विजया रहाटकर यांच्यात बुधवारी रात्री उशिरापर्यंत दीर्घ बैठक झाली. या बैठकीत जवळपास सर्वच नावे निश्चित झाल्याचे सांगण्यात येत आहे. पूर्व राजस्थानमधील प्रमुख नेत्यांपैकी एक असलेले डॉ.किरोरीलाल मीना यांचा मंत्रिमंडळात समावेश होण्याची दाट शक्यता आहे. त्याचवेळी हिंदुत्ववादी चेहरा आणि तिजारा आमदार बाबा बालकनाथ हेही भजनलाल मंत्रिमंडळात सहभागी होऊ शकतात. महिला चेहऱ्यांपैकी अनिता भाडेल, दीप्ती माहेश्वरी आणि प्रथमच आमदार नौक्षम चौधरी यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दलित वर्गातील जितेंद्र गोठवाल आणि ज्येष्ठ आमदार मदन दिलावर यांनाही मंत्री केले जाऊ शकते. पुष्पेंद्रसिंग राणौत, सिद्धी कुमारी यांसारख्या राजपूत समाजातील ज्येष्ठ आमदारांच्या समर्थकांना यावेळी आपला नेता नक्कीच मंत्री होईल, अशी आशा आहे. मुख्यमंत्र्यांनंतर समाजातील एक-दोन आमदारही मंत्री होऊ शकतात, अशी अपेक्षाही ब्राह्मण समाजाला आहे. त्यामुळे संजय शर्मा, संदीप शर्मा, जेतानंद व्यास हे आमदारही शर्यतीत आहेत. नव्या मंत्रिमंडळात सर्वाधिक लक्ष जाट समाजाला मिळणाऱ्या प्रतिनिधित्वावर असेल कारण मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष अशा एकाही पदावर जाट चेहऱ्याला संधी देण्यात आलेली नाही.

# 'सालार'ने रचला इतिहास!

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानचा (SHAH RUKH KHAN) 'डंकी' (DUNKI) आणि दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभासचा (PRABHAS) 'सालार' (SALAAR) हे सिनेमे सध्या सिनेमागृहात धुमाकूळ घालत आहेत. बॉक्स ऑफिसवर हो दोन्ही सिनेमे दणदणीत कमाई करत आहेत. पण प्रभासच्या सालारपेक्षा शाहरुखच्या डंकीचं बॉक्स ऑफिस कलेक्शन खूपच कमी आहे. सॅकनिल्क एंटरटेनमेंटच्या रिपोर्टनुसार, 'सालार' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी 90.70 कोटींची दणदणीत कमाई केली. दुसऱ्या दिवशी 56.35 कोटी, तिसऱ्या दिवशी 62.5 कोटी, चौथ्या दिवशी 46.30 कोटी, पाचव्या दिवशी 24.90 कोटी, सहाव्या दिवशी 15.1 कोटी आणि सातव्या दिवशी 13.50 कोटींचं बॉक्स ऑफिस कलेक्शन जमवलं. एकंदरीतच रिलीजच्या सात दिवसांत या सिनेमाने 308.90 कोटींचा गल्ला जमवला आहे. 'डंकी' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी 29.20 कोटींचा गल्ला जमवला. दुसऱ्या दिवशी 20.12 कोटी, तिसऱ्या दिवशी 25.61 कोटी, चौथ्या दिवशी 30.70 कोटी, पाचव्या दिवशी 24.32 कोटी, सहाव्या दिवशी 11.56 कोटी आणि सातव्या दिवशी 10.50 कोटींचा गल्ला जमवला आहे. एकंदरीतच रिलीजच्या सात दिवसांत या सिनेमाने 161.1 कोटींचं बॉक्स ऑफिस कलेक्शन जमवलं आहे. भारतीय बॉक्स ऑफिसवर शाहरुखचा 'डंकी' डगमगलेला असला तरी जगभरात या सिनेमाचा चांगलाच बोलबाला पाहायला मिळत आहे. जगभरात किंग खानच्या 'डंकी' या सिनेमाचा चांगलाच बोलबाला पाहायला मिळत आहे. जगभरातील बॉक्स ऑफिसवर हा सिनेमा छप्परफाड कमाई करत आहे. जगभरात या सिनेमाने 305 कोटींची कमाई केली आहे. प्रभासचा 'सालार' हा सिनेमा जगभरातील बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई करत आहे. जागतिक पातळीवर या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सालारने रिलीजच्या सहा दिवसांत 450.70 कोटींची कमाई केली आहे.

# प्रशांत दामलेंनी घंटा वाजवून केली सुरुवात

नाट्य पंढरी सांगलीमध्ये यंदाच्या शंभराव्या नाट्य संमेलनाची मुहूर्तमेढ (AKHIL BHARTIYA MARATHI NATYA SAMMELAN) रोवली जात आहे. सांगलीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात मुहूर्तमेढ सोहळा पार पडत आहे. मावळते अध्यक्ष प्रेमानंद गजवी, नियोजित अध्यक्ष जब्बार पटेल आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार,यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न होत आहे. प्रशांत दामले यांच्या हस्ते घंटा वाजवून संमेलन कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. यंदाचे नाट्यसंमेलनाचे शंभरावे वर्ष असल्याने ते ठिकठिकाणी साजरे करण्यात येणार आहे. पुणे, पिंपरी चिंचवड, अहमदनगर, बीड, मुंबई इथेही संमेलन होणार असून समारोप रत्नागिरी या ठिकाणी होणार आहे. तत्पूर्वी नाट्य पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या सांगलीतून या संमेलनाच्या शताब्दी वर्षाचा मुहूर्तमेढ रोवला जातोय. या निमित्ताने दोन दिवस सांगलीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहेत. नाट्यसंमेलनाच्या मुहूर्तमेढ कार्यक्रमादरम्यान नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले म्हणाले,"गेली 40 वर्षे मी पाठ केलेले संवाद बोलत आहे. आज नाट्यसंमेलनाच्या माध्यमातून असं पहिल्यांदाच बोलत आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री, उदय सामंत, शरद पवार ही सर्व मंडळी नाट्यवेडी आहेत. ही मंडळी नेहमीच आमच्या पाठिशी आहेत. आम्हाला काय हवंय आणि काय नकोय हे त्यांना माहिती आहे".

# अंधश्रद्धेचे 'पंचक' सोडवणार

बॉलिवूडची 'धक धक गर्ल' माधुरी दीक्षित (MADHURI DIXIT) आणि तिचे पती डॉ. श्रीराम ने ने (DR. SHRIRAM NENE) निर्मित 'पंचक' (PANCHAK) हा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज आहे. या निमित्ताने या जोडप्याने एबीपी माझाच्या 'माझा कट्टा' (MAJHA KATTA) या कार्यक्रमात हजेरी लावली. आपल्या माणसांसाठी, त्यांच्याच जवळच्या विषयाच्या माध्यमातून एखादी कलाकृती पोहोचावी, या विचाराने अभिनेत्रीने 'पंचक' सिनेमाच्या निर्मितीचा घाट घातला आहे. माधुरी दीक्षित आणि डॉ. श्रीराम नेने निर्मित '15 ऑगस्ट' (15 AUGUST) हा सिनेमा कोरोनाकाळात ओटीटीवर रिलीज झाला होता. या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. आता 'पंचक' या दुसऱ्या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी ते सज्ज आहेत. हा सिनेमा 5 जानेवारी 2023 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होत आहे. माधुरीसमोर विविध धाटणीचे, वेगवेगळ्या विषयांवर भाष्य करणारे सिनेमे होते. पण तरीही तिला 'पंचक' या सिनेमाची कथा भावली. या कथा निवडीबद्दल बोलताना माधुरी म्हणाली,"15 ऑगस्ट'ला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यानंतर मी एका चांगल्या संहितेचा (SCRIPT) शोध घेत होते.



# प्री वेडिंग फंक्शनला आता सुरुवात

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' अर्थात आमिर खानच्या (AAMIR KHAN) घरी आता लगीन घाईला सुरुवात झाली आहे. आमिरची लाडकी लेक इरा (IRA KHAN) तिचा बॉयफ्रेंड नुपुर शिखरेसोबत (NUPUR SHIKHARE) लग्नबंधनात अडकणार आहे. आता त्यांच्या प्री वेडिंग फंक्शनला सुरुवात झाली आहे. आमिरची लेक इरा बॉयफ्रेंड नुपुर शिखरेसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. इरा आणि नुपुर यांचा साखरपुडा मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात इटलीमध्ये झाला होता. त्यानंतर त्यांनी खास पार्टीचं आयोजन करत सर्वांसोबत आपला आनंद शेअर केला होता. या पार्टीत आमिरच्या पूर्वाश्रमीच्या पत्नी रीना दत्ता आणि किरण राव यांच्यासह अभिनेत्री फातिमा सना शेखसह जवळचे कुटुंबिय उपस्थित होते. इरा आणि नुपुर यांच्या साखरपुड्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर चाहते त्यांच्या लग्नसोहळ्याची प्रतीक्षा करत होते. आता येत्या 3 जानेवारी 2024 रोजी इरा आणि नुपुर लग्नबंधनात अडकणार आहेत. आमिर खानची (AAMIR KHAN) लेक इराच्या प्री-वेडिंग फंक्शनला आता सुरुवात झाली आहे. नव्या वर्षाचं जल्लोषात स्वागत करण्यासाठी खान कुटुंबिय सज्ज आहे. बांद्रा येथील ताज लँड्स या पंचतारांकित हॉटेलमध्ये त्यांचा विवाहसोहळा पार पडणार आहे. त्यानंतर 6 ते 10 जानेवारीदरम्यान त्यांचं रिसेप्शन असेल. दिल्ली (DELHI) आणि जयपूर या दोन ठिकाणी त्यांचं रिसेप्शन होणार आहे. काही दिवसांपूर्वी इरा आणि नुपुरचं थाटात केळवण पार पडलं होतं. आमिर खान (AAMIR KHAN) आपल्या लेकीच्या लग्नासाठी खूपच उत्सुक आहे. कुटुंबिय आणि जवळच्या मित्र-मंडळींना आमिर खान वैयक्तिकरित्या लग्नाचं आमंत्रण देत आहे. आमिरच्या लेकीच्या लग्नसोहळ्याला बॉलिवूडकर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. ज्या कलाकारांना लग्नसोहळ्याला उपस्थित राहता येणार नाही ते जयपुर येथील रिसेप्शनला हजेरी लावतील. महाराष्ट्रीयन पद्धतीने इरा आणि नुपुर लग्नबंधनात अडकणार आहेत.आता त्यांच्या प्री वेडिंग फंक्शनला सुरुवात झाली आहे. आमिरची लेक इरा बॉयफ्रेंड नुपुर शिखरेसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. इरा आणि नुपुर यांचा साखरपुडा मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात इटलीमध्ये झाला होता. त्यानंतर त्यांनी खास पार्टीचं आयोजन करत सर्वांसोबत आपला आनंद शेअर केला होता. या पार्टीत आमिरच्या पूर्वाश्रमीच्या पत्नी रीना दत्ता आणि किरण राव यांच्यासह अभिनेत्री फातिमा सना शेखसह जवळचे कुटुंबिय उपस्थित होते. इरा आणि नुपुर यांच्या साखरपुड्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

# मलायकाचा विवाहाबाबत मोठा खुलासा

अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. अभिनेत्रीने 'झलक दिखला जा 11'च्या (JHALAK DIKHHLA JAA 11) मंचावर दुसऱ्या लग्नाबद्दल मोठी हिंट दिली आहे. या कार्यक्रमातील प्रोमो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. मलायका अरोरा अरबाज खानसोबत लग्नबंधनात अडकली होती. पण काही कारणाने त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अभिनेता आणि निर्माता असणारा अरबाज सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट शौरा खानसोबत लग्नबंधनात अडकला. अशातच आता अरबाजची पूर्वाश्रमीची पत्नी मलायकानेदेखील दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. मलायका सध्या छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम 'झलक दिखला जा 11'चं परिक्षण करत आहे. मलायकासह फराह खान, अरशद वारसीदेखील परिक्षकाच्या भूमिकेत आहेत. या कार्यक्रमाच्या नुकत्याच पार पडलेल्या भागात मलायकाने दुसऱ्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'झलक दिखला जा 11' या कार्यक्रमाचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रोमोमध्ये फराह खान मलायकाला विचारते,"2024 मध्ये तू अभिनेत्री आणि सिंगल पॅरेंट असणार की अभिनेत्री आणि डबल पॅरेंट असणार?". यावर उत्तर देत मलायका म्हणते,"मला पुन्हा कोणालातरी दत्तक घ्यावे लागेल". यावर गौहर खान म्हणते,"तू दुसरं लग्न करणार आहेस का?". गौहरच्या प्रश्नाचं उत्तर देत मलायका म्हणते,"एखादी चांगली व्यक्ती असेल तर नक्कीच मी 100% लग्न करण्याचा विचार करेल. मला कोणी लग्नासाठी मागणी घातली तर मी पुन्हा संसार थाटेल". मलायकाच्या या वक्तव्यामुळे ती दुसऱ्या लग्नासाठी तयार असल्याचं स्पष्ट दिसत आहे. अरबाज खानसोबत विभक्त झाल्यानंतर मलायकाच्या आयुष्यात अर्जुन कपूरची (ARJUN KAPOOR) एन्ट्री झाली. गेल्या अनेक दिवसांपासून अर्जुन आणि मलायका एकमेकांना डेट करत आहेत. अनेकदा दोघांना एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. त्यांचे फोटो आणि व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अर्जुन कपूर काही दिवसांपूर्वी 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमात सहभागी झाला होता. त्यावेळी त्याला मलायका आणि त्याच्या रिलेशनबद्दल प्रश्न विचारण्यात आला. पण दोघे एकत्र असताना आम्ही यावर बोलू असं उत्तर अभिनेत्याने दिलं.अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. अभिनेत्रीने 'झलक दिखला जा 11'च्या (JHALAK DIKHHLA JAA 11) मंचावर दुसऱ्या लग्नाबद्दल मोठी हिंट दिली आहे. या कार्यक्रमातील प्रोमो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.



# कमिन्सने पटकावल्या 10 विकेट्स!

## » ऑस्ट्रेलियाची पाकिस्तानविरुद्ध विजयी आघाडी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ७९ धावांनी पराभव केला. या मालिकेतील ऑस्ट्रेलियाचा हा सलग दुसरा विजय आहे. त्याचबरोबर तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. मेलबर्न येथे झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३१८ धावा आणि दुसऱ्या डावात २६२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानने पहिल्या डावात २६४ धावा आणि दुसऱ्या डावात २३७ धावा केल्या. या सामन्यासाठी पॅट कमिन्सला ‘प्लेअर ऑफ द मॅच’ म्हणून निवडण्यात आले. कमिन्सने एकूण १० विकेट्स घेतल्या आहेत.**



ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात सर्वबाद ३१८ धावा केल्या होत्या. यादरम्यान लाबुशेनने १५५ चेंडूंचा सामना करत ६३ धावा केल्या. लाबुशेनच्या या खेळीत ५ चौकारांचा समावेश होता. सलामीवीर उस्मान ख्वाजाने ४२ आणि डेव्हिड वॉर्नरने ३८ धावांचे योगदान दिले. मिचेल मार्शने ४१ धावा केल्या. यादरम्यान पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना जमालने ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर शाहीन आफ्रिदी, मीर हमजा आणि हसन अली यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पाकिस्तानने पहिल्या डावात सर्वबाद २६४ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये मसूदने अर्धशतक झळकावले. त्याने ५४ धावा केल्या. बाबर आझम या डावात फ्लॉप ठरला. तो एक धावा करून बाद झाला. रिझवानने ४२ धावांची तर शफीकने ६२ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना कर्णधार कमिन्सने ५ विकेट्स घेतल्या. त्याने २० षटकांत ४८ धावा दिल्या. नॅथन लायनने ४ विकेट्स घेतल्या. मिचेल मार्शने दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियासाठी शानदार फलंदाजी केली. त्याने १३० चेंडूंचा सामना करत ९६ धावा केल्या. मार्शने या खेळीत १३ चौकार मारले. ॲलेक्स कॅरीने ५३ आणि स्टीव्ह स्मिथने ५० धावा केल्या. यादरम्यान पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना शाहीन आफ्रिदी आणि मीर हमजा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. तसेच जमालने २ विकेट्स घेतल्या. पाकिस्तानला विजयासाठी ३१७ धावांची गरज होती. मात्र २३७ धावा करून संघ सर्वबाद झाला. या डावात शान मसूद ६० धावा करून बाद झाला. त्याने ७ चौकार मारले. बाबर आझमने ४१ धावांची खेळी केली. रिझवानने ३५ धावांचे योगदान दिले. या मालिकेतील पाकिस्तान संघाचा हा सलग दुसरा पराभव आहे. कमिन्सने १८ षटकात ४९ धावा देत ५ विकेट घेतल्या. त्याने या सामन्यात एकूण १० विकेट्स घेतल्या.ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात सर्वबाद ३१८ धावा केल्या होत्या. यादरम्यान लाबुशेनने १५५ चेंडूंचा सामना करत ६३ धावा केल्या. लाबुशेनच्या या खेळीत ५ चौकारांचा समावेश होता. सलामीवीर उस्मान ख्वाजाने ४२ आणि डेव्हिड वॉर्नरने ३८ धावांचे योगदान दिले. मिचेल मार्शने ४१ धावा केल्या. यादरम्यान पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना जमालने ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर शाहीन आफ्रिदी, मीर हमजा आणि हसन अली यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पाकिस्तानने पहिल्या डावात सर्वबाद २६४ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये मसूदने अर्धशतक झळकावले. त्याने ५४ धावा केल्या. बाबर आझम या डावात फ्लॉप ठरला. तो एक धावा करून बाद झाला. रिझवानने ४२ धावांची तर शफीकने ६२ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना कर्णधार कमिन्सने ५ विकेट्स घेतल्या. त्याने २० षटकांत ४८ धावा दिल्या. नॅथन लायनने ४ विकेट्स घेतल्या. मिचेल मार्शने दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियासाठी शानदार फलंदाजी केली. कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ७९ धावांनी पराभव केला. या मालिकेतील ऑस्ट्रेलियाचा हा सलग दुसरा विजय आहे.

### पाकिस्तानचा सलग दुसरा पराभव

» बाबर आझम या डावात फ्लॉप ठरला. तो एक धावा करून बाद झाला. रिझवानने ४२ धावांची तर शफीकने ६२ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना कर्णधार कमिन्सने ५ विकेट्स घेतल्या. त्याने २० षटकांत ४८ धावा दिल्या. नॅथन लायनने ४ विकेट्स घेतल्या. मिचेल मार्शने दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियासाठी शानदार फलंदाजी केली. त्याने १३० चेंडूंचा सामना करत ९६ धावा केल्या. मार्शने या खेळीत १३ चौकार मारले. ॲलेक्स कॅरीने ५३ आणि स्टीव्ह स्मिथने ५० धावा केल्या. यादरम्यान पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना शाहीन आफ्रिदी आणि मीर हमजा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. तसेच जमालने २ विकेट्स घेतल्या. पाकिस्तानला विजयासाठी ३१७ धावांची गरज होती. मात्र २३७ धावा करून संघ सर्वबाद झाला. या डावात शान मसूद ६० धावा करून बाद झाला. त्याने ७ चौकार मारले. बाबर आझमने ४१ धावांची खेळी केली. रिझवानने ३५ धावांचे योगदान दिले. या मालिकेतील पाकिस्तान संघाचा हा सलग दुसरा पराभव आहे.

# ‘या’ खेळाडूपेक्षा चांगला फलंदाज आमच्याकडे नाही

## » सेंच्युरियनमध्ये भारताच्या पराभवावर हरभजन सिंगची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा पराभव झाल्यानंतर आता टीम इंडियावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सेंच्युरियन कसोटीत टीम इंडियाने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागात खराब प्रदर्शन केले. या कसोटी मालिकेसाठी निवड समितीने संघातील युवा खेळाडूंवर अधिक विश्वास व्यक्त केला आहे.**






ज्यामुळे अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा यांसारख्या कसोटी क्रिकेटमधील बड्या खेळाडूंना या मालिकेसाठी संघात स्थान मिळालेले नाही. यावर आता टीम इंडियाचा माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंगने संताप व्यक्त केला आहे. चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे या दोघांनाही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेत संधी मिळाली नाही. आता आपल्या यूट्यूब चॅनलवर याबद्दल बोलताना हरभजन सिंग म्हणाला की, “रहाणे आणि पुजाराला कसोटी संघातून का वगळण्यात आले, हे मला समजत नाही. या दोन्ही खेळाडूंनी संघासाठी सर्वत्र धावा केल्या आहेत. जर आपण मागील विक्रमांबद्दल बोललो, तर पुजाराने विराट कोहलीइतकेच योगदान दिले आहे. तरीही पुजाराला संघातून वगळण्यात आले, जे मला समजू शकत नाही. कसोटी क्रिकेटमध्ये पुजारापेक्षा चांगला फलंदाज आमच्याकडे नाही. हरभजन सिंग पुढे म्हणाला, “तीन दिवसांत भारत एका क्षणासाठीही सामन्यात दिसला नाही. पहिल्या डावात नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना २४५ धावा केल्या आणि हे सर्व केएल राहुलचे आभार आहे. त्याने शानदार खेळी खेळून भारताची धावसंख्या २४५ धावांपर्यंत नेली. भारताला दुसऱ्या डावात केवळ १३१ धावा करता आल्या. यामध्ये जर विराट कोहलीचे योगदान नसते, तर ते आणखी कठीण झाले असते. पहिल्या डावातील भारताच्या कामगिरीवर या सामन्याचा निर्णय झाला. अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा हे दोघेही २०२३ च्या सुरुवातीला वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या गेलेल्या कसोटी मालिकेत सहभागी झाले होते. या मालिकेनंतर या दोघांनाही कसोटी संघातून वगळण्यात आले.

### फलंदाजी आणि गोलंदाजी खराब

» भारतीय संघासाठी महत्त्वाच्या प्रसंगी अनेक चमकदार खेळी खेळल्या आहेत.पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा पराभव झाल्यानंतर आता टीम इंडियावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सेंच्युरियन कसोटीत टीम इंडियाने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागात खराब प्रदर्शन केले.